आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ मे २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातला प्रचार शिगेला / प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचा आज पश्चिम बंगाल आणि ओदिशात प्रचार दौरा
- निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात महिला मतदात्यांचं प्रमाण पुरुषांच्या तुलनेत तीन टक्क्याहून जास्त
- आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत देशाच्या जीडीपीत ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ होईल असा भारतीय स्टेट बँकेचा अंदाज
- एकाच हंगामात दोन वेळा माऊंट एव्हरेस्ट आणि माऊंट ल्होत्से चढण्याचा विक्रम भारतीय गिर्यारोहक सत्यदीप गुप्ता यांच्या नावे जमा

  **आणि**
- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत नोवाक जोकोविचचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातला प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. प्रचारासाठी केवळ दोन दिवसांचा कालावधी असताना सर्वपक्षीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ५७ जागांवर येत्या १ जून रोजी मतदान होत आहे. अखेरच्या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघातलं मतदानही याच टप्प्यात होणार आहे.

प्रधानमंत्री सध्या पश्चिमबंगालमधे प्रचार दौऱ्यावर असून त्यांनी आज मथुरापूरमधे सभा घेतली. नागरिकत्व कायद्याबद्दल विरोधक जनतेची दिशाभूल करीत असून विरोधकांना बंगालमधे घुसखोरांना आसरा द्यायचा आहे असा आरोप मोदी यांनी केला. मोदी यांनी काल चोवीस परगणा जिल्ह्यात बरासात आणि बशिरहाट लोकसभा मतदारसंघातल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतल्या. भ्रष्टाचार करणाऱ्यांविरोधातील कारवाई ४ जूननंतर आणखी तीव्र केली जाईल, असं मोदी यांनी विरोधकांवर टीका करताना सांगितलं. प्रधानमंत्री मोदी आज ओदिशातही तीन प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. भाजप अध्यक्ष जे पी नड्डा आज झारखंडमधे दुमका आणि गोड्डा इथं सभा घेत आहेत, तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी उद्या दुमका इथं प्रचारसभेला संबोधित करतील.

संरक्षणमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह आज बिहारमधल्या बक्सर, आराह आणि पाटना साहिब लोकसभा मतदारसंघातल्या प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. तर बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हे भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव आज पाटलीपुत्र मतदारसंघात प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. तर राजद नेते तेजस्वी यादव सासाराम, काराकाट आणि पाटलीपुत्रमध्ये सभा घेणार आहेत.

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज उत्तरप्रदेशात चार प्रचारसभा घेणार आहेत. गाझीपूर लोकसभा मतदारसंघात शहा यांचा रोड शो होणार आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आज कुशीनगर, देवरीया आणि गोरखपूरमध्ये प्रचारसभा घेतील. तर समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश

यादव आज रॉबर्ट्सगंज आणि मिर्झापूर लोकसभा मतदारसंघातल्या मतदारांना संबोधित करणार आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात देशातल्या आठ राज्यांत ५८ जागांवर मतदान झालं. या टप्प्यात मतदान करणाऱ्या मतदारांची आकडेवारी आयोगानं प्रसिद्ध केली असून, त्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत तीन टक्क्यांहून जास्त नोंदवल्याची माहिती निवडणूक आयोगानं काल जाहीर केली.

निवडणूक आयोगानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार या टप्प्यात ६४ पूर्णांक ९५ शतांश टक्के महिला मतदारांनी तर ६१ पूर्णांक ९५ शतांश टक्के पुरुष मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याशिवाय १८ पूर्णांक ६७ शतांश टक्के तृतीयपंथी मतदारांनी मतदान केलं.

<><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामीनाची मुदत वाढवायला सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. केजरीवाल यांनी नियमित जामिनासाठी खालच्या न्यायालयात अर्ज करावा असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

दरम्यान, अरविंद केजरीवाल यांना १० मे रोजी न्यायालयाने अंतरिम जामीन दिला होता. त्याची मुदत संपल्यावर २ जून रोजी त्यांना तिहार कारागृहात समर्पण करावं लागेल.

<><><><><>

आयएएस आधिकारी प्रदिप कुमार त्रिपाठी यांची ३० जूनपर्यंत लोकपालचे सचिव म्हणून नियुक्ती झाली आहे. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं कर्मचारी निवड आयोगाचे अध्यक्ष म्हणून आयएएस अधिकारी राकेश रंजन यांच्या नियुक्तीलाही मान्यता दिली आहे. आयएएस अधिकारी अमित यादव यांची सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागात विशेष कर्तव्य अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. विद्यमान सचिव सौरभ गर्ग हे ३१ जुलै रोजी निवृत्त झाल्यानंतर यादव सचिवपदाची सूत्रे स्वीकारतील. आयएएस अधिकारी राज कुमार गोयल यांची गृह मंत्रालयातल्या सीमा व्यवस्थापन विभागाच्या सचिव पदावरून कायदा आणि न्याय मंत्रालयातल्या न्याय विभागाच्या सचिवपदी बदली करण्यात आली आहे. समितीं आयएएस अधिकारी राजेंद्र कुमार यांची सीमा व्यवस्थापन विभागात सचिव पदावर नियुक्तीला मान्यता दिली आहे.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी मुंबई शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून शिवाजीराव नलावडे यांना उमेदवारी दिली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब यांना आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून जे एम अभ्यंकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ७ जून आहे.

<><><><><>

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत भारताचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ होणार आहे. तर एकूण उत्पन्न ८ टक्के वाढेल, असा अंदाज स्टेट बँक ऑफ इंडियाने काल जाहीर

केलेल्या अहवालात व्यक्त केला आहे. देशाच्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात सातत्याने आर्थिक वाढ होत असल्याचंही या अहवालात म्हटलं आहे. प्रवासी वाहन विक्री, जीएसटी संकलन, क्रेडिट कार्डचा वापर, टोल संकलन यांचा शहरी भागातल्या आर्थिक वाढीत वाटा आहे. तर ग्रामीण भागात दुचाकी विक्री आणि पेट्रोलियम पदार्थांच्या वापराचा वाटा जास्त असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अर्थात 'फिकी'नं नवी दिल्ली इथं कोल्ड चेन आणि लॉजिस्टिक्स परिषदेचं आयोजन केलं आहे. भारतात तयार होणाऱ्या नाशिवंत वस्तूंच्या उद्योगाला चालना देण्यासाठी कार्यक्षम कोल्ड चेन यंत्रणा विकसित करण्याच्या दृष्टीने नवनिर्मितीला चालना देणं हा या परिषदेचा उद्देश आहे. या विषयावर चर्चा होणं ही काळाची गरज असल्याचं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे संयुक्त सचिव डॉ. सुरेंद्र अहिरवार यांनी या परिषदेला संबोधित करताना केलं.

**<><><><><>**

१९९९ मध्ये पाकिस्ताननं भारताबरोबरच्या करारचं उल्लंघन केलं होतं अशी कबुली पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री नवाझ शरीफ यांनी काल पाकिस्तान मुस्लिम लीगच्या सर्वसाधारण बैठकीत दिली. २८ मे १९९८ रोजी आपण अण्वस्त्र चाचणी घेतली होती, २१ फेब्रुवारी १९९९ रोजी तत्कालीन प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी लाहोरला भेट दिली होती आणि लाहोर घोषणापत्रावर स्वाक्षरी केली होती. तरीही पाकिस्तानी सैन्यानं जम्मू-काश्मीरच्या कारगिल जिल्ह्यात घुसखोरी केली, आणि त्यामुळेच कारगिल युद्ध झालं, असा खुलासाही शरीफ यांनी केला.

या बैठकीत शरीफ यांची PML-N पक्षाचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. पनामा पेपर्स प्रकरणी गेल्या ६ वर्षांपासून न्यायालयानं त्यांना अपात्र घोषित केलं होतं.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र - युएनच्या आंतरराष्ट्रीय शांती रक्षक दिना निमित्त परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. युद्धग्रस्त भागामध्ये शांतता आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी जिवाची बाजी लावून काम करणाऱ्यांबद्दल आदर व्यक्त करत त्यांचं कौतुक जयशंकर यांनी समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय सैन्यदलातल्या मेजर राधिका सेन यांची संयुक्त राष्ट्राच्या २०२३ साठी दिल्या जाणाऱ्या मिलिटरी जेंडर ॲडव्होकेट ऑफ द इयर पुरस्कारासाठी निवड झाली आहे. काँगोमधे उत्तर किव इथल्या युवा आणि महिलांच्या सुरक्षेसाठीच्या लढ्यात राधिका सेन यांनी भरीव योगदान दिलं.

**<><><><><>**

भारतीय गिर्यारोहक सत्यदीप गुप्ता यांनी एकाच हंगामात दोन वेळा माऊंट एव्हरेस्ट आणि माऊंट ल्होत्से चढण्याचा विक्रम केला आहे, असा विक्रम नोंदवणारे ते पहिले गिर्यारोहक ठरले आहे.

सत्यदीप गुप्ता यांनी सोमवारी ११ तास १५ मिनिटांत माऊंट ल्होत्से सर करत विक्रम रचला. त्यानंतर सत्यदीप यांनी मध्यरात्री पाऊणच्या सुमारास माऊंट

एव्हरेस्ट सर केलं. सत्यदीप गुप्ता यांच्यासोबत पेस्टेम्पा शेर्पा आणि नीमा उंगडी शेर्पा होते. याआधी गुप्ता यांनी २१ मे ला माऊंट एव्हरेस्ट आणि २२ मे ला माऊंट ल्होत्सेवर चढाई केली होती.

**<><><><><>**

पॅरिसमध्ये सुरू असलेल्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत नोवाक जोकोविचने सरळ सेटमध्ये विजय मिळवत फ्रेंच ओपनच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. फ्रेंच खुल्या स्पर्धेचं जेतेपद राखण्यासाठी त्याने पहिल्या फेरीच्या सामन्यात पियर-ह्युग्स हर्बर्टवर जोरदार विजय मिळवला. दुसऱ्या फेरीत त्याचा सामना स्पेनच्या रॉबर्टो कार्बालेस बायना याच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

उजबेकिस्तान इथं झालेल्या आशियाई पॅरा कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी एक सुवर्ण आणि सहा कास्य पदकांसह सात पदकं पटकावली.

**//<><><><><>//**